


# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ८५ वा ❑ भारतीय सौर दिनांक २२ वैशाख शके १९४८, मंगळवार दि.१२ मे २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### लुटेरी नवरी

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

लुटेरी नवरी हे शिर्षक वाचून आपण चक्रावला असलाच..!! लुटेरी नवरी हे चित्रपटाचे नाव नसून ती एक तरुणी की ज्या तरुणीने चक्क ९ नवरे केले आणि नऊ नवऱ्यानां लुटले.

बीड जिल्ह्यात एका तरुणीने लग्नाचे नाटक करून तब्बल ९ जणांशी लग्न केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.,ही तरुणी एजंट्सच्या मदतीने ग्रामीण भागातील तरुणांना लग्नाचे आमिष दाखवून लाखो रुपये आणि दागिने घेऊन पसार व्हायची.

लुटेरी वधू या संघटित गुन्हेगारी टोळ्यांचा भाग असतात, ज्या तरुण पुरुषांना लग्नाचे आमिष दाखवून फसवतात आणि नंतर पैसे व दागिने घेऊन पळून जातात. या टोळ्या अनेकदा नातेसंबंधात अडचणींना तोंड देणाऱ्या भोळ्या किंवा वयस्कर अविवाहित पुरुषांना लक्ष्य करतात. टोळीचे सदस्य लग्न जुळवण्यासाठी खोटे पालक आणि नातेवाईक असल्याचे भासवतात आणि नंतर काही दिवसांतच मौल्यवान वस्तू घेऊन गायब होतात.

टोळ्या मध्यस्थांमार्फत सक्रियपणे वर शोधतात. टोळीतील इतर सदस्य वधूचे आई-वडील, भाऊ किंवा नातेवाईक असल्याचे भासवतात.कुटुंबाचा संशय टाळण्यासाठी या टोळ्या विधींशिवाय, घाईघाईने विवाह जुळवतात.

लग्नानंतर लगेच, काही दिवसांतच, वधू रोख रक्कम, दागिने आणि मौल्यवान वस्तू घेऊन फरार होते. काही प्रकरणांमध्ये, वधूवर बलात्कार किंवा विनयभंगाचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन या टोळ्या मोठ्या प्रमाणात पैसे उकळतात.

महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात एका १९ वर्षीय तरुणीने लग्नाचे नाटक करून तब्बल ९ नवरदेवांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पोलिस तपास सुरू असून एका मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश झाला आहेएका वधू चोराने नऊ वेळा लग्न केले आणि नवव्या लग्नात ती पकडली गेली.तरुणीने मध्यस्थी (एजंट) मार्फत ८लग्ने केली होती आणि तिचे हे ९ वे लग्न होते. विवाहानंतर काही दिवसांतच नवरी सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड घेऊन पळून जात असे.

असा लागला छडा? उमापूर येथील तरुणाशी लग्न केल्यानंतर नवरदेवाला संशय आल्याने या रॅकेटचा पर्दाफाश झाला. या रॅकेटमध्ये नवरीसह एजंट्सचाही समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे.

महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश (कानपूर): दिव्याशी चौधरी नावाच्या एका वधू लुटणाऱ्या महिलेने दोन बँक व्यवस्थापकांसह १२ हून अधिक लोकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली.

राजस्थान (सीकर/जयपूर)मध्ये एका टोळीने अडीच ते दोन लाख रुपयांचा सौदा करून लग्नानंतर दागिने घेऊन पळ काढला.

मध्य प्रदेश (सेहोर/छिंदवाडा) या राज्यात देखील बनावट वधू त्यांच्या प्रियकरांसह १५-२० दिवसांनंतर दागिने आणि बाईक्स घेऊन पळून गेल्या.

उत्तर प्रदेश/हरियाणा (चांदनी गँग): येथील२४ वर्षीय चांदनीने १० दिवसांत १५ वेळा लग्न केले.

लग्न हा आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय आहे. केवळ समाज, कुटुंब किंवा एकाकीपणावर मात करण्यासाठी घाईगडबडीत घेतलेला लग्नाचा निर्णय भविष्यात त्रासदायक ठरू शकतो.लग्न ठरवताना अनेक एजंट धंद्याचे स्वरूप आणून फसवणूक करू शकतात. वधू-वर सूचक मंडळे किंवा अनोळखी एजंटकडून लग्नाचे व्यवहार करताना योग्य चौकशी करा.त्यानंतरच पुढे पाऊल टाका.






## हिंदुत्वाच्या स्पष्टतेतूनच राष्ट्रीय एकता निर्माण होईल - सुनील आंबेकर

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – ''विश्वकल्याणाचा भाव असलेले हिंदुत्व हीच या राष्ट्राची खरी ओळख आहे. हिंदुत्वाच्या विचारात स्पष्टता आली, तरच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकता निर्माण होईल आणि त्यातूनच राष्ट्राची पुढील दिशा स्पष्ट होईल,'' असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी केले.

कर्वेनगर येथील कमिन्स अभियांत्रिकी महाविद्यालयातील के बी जोशी सभागृहामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या छत्रपती संभाजी भागाच्या वतीने आयोजित 'संघ शताब्दी मंथन' कार्यक्रमात ते मुख्य वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर डेक्कन अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ भूषण पटवर्धन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय संपर्क विभागाचे कार्यालय प्रमुख प्रणव पवार आणि छत्रपती संभाजी भागाचे संघचालक अनिल व्यास यांची उपस्थिती होती.



समाजाचा पाठिंबा हाच संघकार्याचा आधार असल्याचे नमूद करून सुनील आंबेकर म्हणाले, ''संघ स्वयंसेवकांची साधना ओळखून समाजाने विपरित परिस्थितीत संघाला साथ दिली. आता व्यक्ति निर्माणाचे कार्य प्रत्येक कुटुंबात पोहोचणे आवश्यक आहे. केवळ संघाच्या भरवशावर समाजपरिवर्तन शक्य नाही; त्यासाठी समाजाचा सक्रिय सहभाग अनिवार्य आहे. समाजाचे अवलंबित्व कमी करून स्वावलंबी व्यवस्था निर्माण करणे हेच संघाचे ध्येय आहे. मुस्लिम प्रश्न हा संघाच्या स्थापनेपूर्वीपासून असून, संघ तो सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

भारतीय ज्ञानाचे पुनरुज्जीवन

डॉ भूषण पटवर्धन यांनी शिक्षण पद्धतीवर भाष्य करताना भारतीय ज्ञानावर विश्वास निर्माण करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, ''सध्या शिक्षणात पाश्चात्य मोनोकल्चरचा प्रभाव वाढला असून, आहार, विहार आणि विचारांतून भारतीयत्व हरवत चालले आहे. भारतीय ज्ञान आधुनिक विज्ञानाच्या कसोटीवर सिद्ध करून जगासमोर मांडण्याची गरज आहे. मानव्यशास्त्रात जागतिक दर्जाच्या संस्था भारतात उभ्या राहायला हव्यात आणि डेक्कन कॉलेजमध्ये ते सामर्थ्य आहे.''

सुनील आंबेकर म्हणाले :

लोकशाही रक्षण : आणीबाणीच्या काळात स्वयंसेवकांनी संविधानाच्या रक्षणासाठी आणि लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी मोठे योगदान दिले.

मतांतरण व जागृती : लोकसंख्याशास्त्रीय बदल आणि मतांतरण रोखण्यासाठी केवळ कायदा पुरेसा नाही, तर हिंदू समाजाने संघटित आणि जागृत राहणे गरजेचे आहे.

युवा संवाद : नवीन पिढीशी प्रभावी संवाद साधून त्यांच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवत त्यांना राष्ट्रकार्यात सोबत घ्यायला हवे–

## दिसतं तसंच असतं

ज्योतिर्मय साहित्य

दै. प्रभातमध्ये माझं बालजिज्ञासा या विषयावरचं असं का? हे सदर सुरू झालं. माझ्या दोन्ही मुलांनी मला विचारलेले प्रश्न, त्यांच्या शंकाकुशंका, गमतीजमती यावर आधारित हे सदर सुरू झाल्यापासून मला अनेकांनी वेगवेगळे प्रश्न विचारायला सुरुवात केली. अनेकांनी यावर माझ्याशी चर्चाही केली. बहुतेक जणांचे प्रश्न आणि चर्चेचा सूर कॉमन होता. असाच किस्सा आमच्या घरीही घडलाय, हाच प्रश्न माझ्या मुलांनी विचारला होता. मग या सगळ्या प्रश्नांवर तुला लिहावंसं कसं वाटलं किंवा त्या त्यावेळी तू जे मुलांचं शंका निराकरण केलं ते तुला कसं जमलं? वगैरे.. यावर मी बराच विचार केला तेव्हा माझ्या लक्षात काही गोष्टी आल्या. त्यातली एक अत्यंत महत्त्वाची म्हणजे मला माझं बालपण आठवलं. माझी आई प्राथमिक शिक्षिका. बऱ्याच वेळा उत्तरपत्रिका तपासायला ती घरी आणायची आणि त्या उत्तरपत्रिका आम्ही पाहिलेल्या असायच्या. वर्गात घडलेले प्रसंग, मुलांच्या गमती जमती ती आम्हालाही सांगायची. मला वाटतं माझ्या मनात निर्माण झालेल्या या विषयाचे उगमस्थान तेच असावं. म्हणी पूर्ण करा हा प्रश्न. म्हण होती, कुऱ्हाडीचा दांडा..

ती एका विद्यार्थ्यांनं पूर्ण करताना लिहिलं होत, कुऱ्हाडीचा दांडा मोडका. खरंतर कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ अशी ती म्हण. त्याचे उत्तर वाचून आम्ही खूप हसलो होतो. पण मला आठवतं काही क्षणातच आई एकदम गंभीर झाली होती आणि म्हणाली होती की मोडका हा शब्द ज्या विद्यार्थ्यांनं लिहिलाय त्या विद्यार्थ्यांची यामागची मानसिकता तपासून बघायला हवी आणि तिने त्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तेव्हा तो विद्यार्थी तिला म्हणाला की, आमच्या घरातल्या कुऱ्हाडीचा दांडा खरोखरच मोडका आहे म्हणून मी असं उत्तर लिहिलं. पुढं तो म्हणाला की कुऱ्हाडीचा दांडाच काय आमच्या घरातली प्रत्येक वस्तू मोडकी आहे. त्याच्या या वाक्यावरून त्याच्या घरच्या दारिद्र्याची कल्पना आईला आली. तो प्रसंग तिनं आम्हाला अशा पद्धतीने सांगितला की आज इतक्या वर्षांनंतरही आम्ही कुणीच ते वाक्य आणि तो विद्यार्थी विसरलेलो नाही आहोत.



हाच प्रसंग मी माझ्या मुलांना सांगत होते आणि वातावरण जरा गंभीर होतेय असं पाहून कृष्णाच्या बाबांनी त्यांच्या बालपणीचा एक किस्सा आम्हाला सांगितला तो असा होता, त्यावेळी इयत्ता पाचवीच्या अभ्यासक्रमामध्ये पहिल्यांदी हिंदी हा विषय असायचा. हिंदीच्या तासाला शिक्षकांनी मुलांना निबंध लिहून आणायला सांगितला. विषय होता 'रेल्वे स्टेशन पर एक घंटा'

आणि त्यावेळी अशी पद्धत होती वर्गात प्रत्येकानं आपण लिहून आलेला निबंध वाचून दाखवायचा. एक मुलगा आपला निबंध वाचायला उभा राहिला. त्याने लिहिलं होतं, ''हमारे गाव के बाहर बडासा रेल्वे स्टेशन है. उस स्टेशनपर सुबह एक और शाम को एक ट्रेन आती है. हम रोज सुबह और शाम वो रेल्वे देखने स्टेशनपर जाते है. वहां बहुत मजा आता है रेल्वे स्टेशन पे एक बहुत बडी पीतल की घंटा है. उसकी आवाज बहुत अच्छी है. हम सब दोस्तोंको वो घंटा बजाने की बडी इच्छा होती है, पर वो हमारे हाथ आती नहीं है.'' इ. इ.




या दोन्ही प्रसंगांकडे बारकाईने पाहिलं, तर मुलांच्या मनाचा एक अत्यंत नाजूक आणि महत्त्वाचा पैलू आपल्या लक्षात येतो. मुलं जगाला ''जसं आहे तसं'' नव्हे, तर ''जसं त्यांना दिसतं तसं'' समजून घेतात.

''कुऱ्हाडीचा दांडा मोडका'' असं उत्तर लिहिणारा विद्यार्थी चुकीचा नव्हता; तो प्रामाणिक होता. त्याने पाठांतर केलेली म्हण लिहिण्याऐवजी आपल्या अनुभवातून आलेलं वास्तव त्यानं मांडलं. यावरून मुलांच्या विचारप्रक्रियेचं एक वैशिष्ट्य स्पष्ट होतं. त्यांची समज ही त्यांच्या आजूबाजूच्या परिस्थितीशी घट्ट जोडलेली असते. घरातली मोडकळीस आलेली साधनं, दारिद्र्य, वातावरण हे सगळं त्याच्या शब्दांत उतरलं. म्हणजेच, मुलं केवळ भाषा शिकत नसतात, तर त्या भाषेतून आपलं आयुष्य व्यक्त करत असतात.

दुसऱ्या प्रसंगात ''रेल्वे स्टेशन पर एक घंटा'' या विषयाचा मूळ अर्थ होता रेल्वे स्टेशनवर घालवलेल्या एका तासात केलेलं निरीक्षण मांडणं. म्हणजेच, गाड्यांची ये-जा, प्रवाशांची लगबग, विक्रेत्यांचे आवाज, तिकिट खिडकीवरील रांगा असं एक जिवंत चित्र उभं करणं अपेक्षित होतं. पण त्या विद्यार्थ्याने ''घंटा'' या शब्दाचा 'मराठी' अर्थ घेतला आणि संपूर्ण निबंध त्या स्टेशनवर असलेल्या घंटेभोवती गुंफला.

पहिल्या दृष्टिक्षेपात हे उत्तर चुकीचं वाटू शकतं; परंतु मानसशास्त्रीय दृष्टीने पाहिलं, तर ही एक वेगळीच विचारप्रक्रिया आहे. त्या मुलाने ''एक घंटा'' या शब्दसमुहाचा अर्थ ''एक तास'' असा न लावता ''घंटा'' या वस्तूवर केंद्रित केला. ''तास'' ही वेळ सांगणारी संकल्पना आहे, तर ''घंटा'' ही त्याला दिसणारी, ऐकू येणारी वस्तू म्हणून त्याने त्या गोष्टीला धरून आपला अनुभव मांडला.


यात आणखी एक महत्त्वाची गोष्ट दिसून येते. मुलांची कल्पनाशक्ती आणि स्वतःचा दृष्टिकोन. त्या मुलासाठी रेल्वे स्टेशनचं मुख्य आकर्षण आगगाड्यांपेक्षा ती मोठी घंटा होतं. कदाचित त्याला तिचा आवाज, तिचं आकारमान किंवा तिला वाजवण्याची अपूर्ण राहिलेली इच्छा हे सगळं अधिक ठळकपणे जाणवलं असेल. म्हणूनच त्याने त्या एकाच गोष्टीभोवती पूर्ण अनुभव रंगवला.

ही घटना आपल्याला सांगते की, मुलं केवळ दिलेल्या सूचनांनुसार विचार करत नाहीत, तर त्या सूचनांचा अर्थ स्वतःच्या पद्धतीने लावतात. त्यांच्या दृष्टीने ''बरोबर'' उत्तर हे पुस्तकातलं नसून त्यांच्या अनुभवातून आणि जाणिवेतून आलेलं असतं.

अशा वेळी शिक्षक आणि पालकांनी ''चूक'' शोधण्यापेक्षा त्या उत्तरामागचा विचार समजून घेणं अधिक महत्त्वाचं ठरतं. कारण अशाच वेगळ्या दृष्टिकोनातून सर्जनशीलता जन्म घेते. शब्दांचा वेगळा अर्थ लावण्याची ही क्षमता, एखाद्या छोट्या तपशीलाला केंद्रस्थानी ठेवून मोठं चित्र रंगवण्याची ही वृत्ती हीच पुढे एखाद्या लेखकाची, कलाकाराची ओळख ठरू शकते. अनेकदा मोठ्यांच्या दृष्टीने ही उत्तरं ''चुकीची'' वाटू शकतात, पण खरं तर ती मुलांच्या मनाचा आरसा असतात.

मुलं प्रश्न विचारतात, वेगवेगळ्या पद्धतीने उत्तरं देतात, कारण त्यांचं जग अजून ठरलेलं नसतं. ते अनुभव घेत असतात, अर्थ लावत असतात आणि त्या अर्थाला शब्द देत असतात. अशा वेळी त्यांना दुरुस्त करण्यापेक्षा त्यांचं ऐकणं, त्यांच्या विचारांमागचं कारण समजून घेणं अधिक गरजेचं ठरतं.

याच प्रक्रियेतून संवेदनशीलता, निरीक्षणशक्ती आणि सर्जनशीलता विकसित होते आणि म्हणूनच, अशी मुलं पुढे केवळ अभ्यासातच नव्हे, तर लेखन, कला आणि विचारविश्वातही वेगळी ओळख निर्माण करू शकतात.




## जात्यावरच्या ओव्या......

वाट तापली उन्हान
गवत वाळल रानात
कुणी पाडली ठिणगी
वणवा पेटला उन्हात ||६३७||

वाट तापली उन्हान
कुठ गेले वाटसरू?
दाट आंब्याच्या झाडाखाली
दुपारी लागलेत घोरू ||६३८||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग २९



उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

पदी राघवाचे सदा ब्रीद गाजे ।
बळें भक्तरीपूशिरी काम्बि वाजे ।
पुरी वाहिली सर्व जेणें विमानीं।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी।२९।

अर्थ : आपल्या भक्तांचे रक्षण करणारा हे त्या राघवाचे वचन पदोपदी गाजत आहे म्हणजेच त्याचा जयघोष सर्वत्र ऐकू येतो. त्याच्या भक्तांच्या शत्रूवर (त्यांच्या डोक्यावर) तो जोराने आपल्या धनुष्य दंडाचा प्रहार करतो. प्रभू रामचंद्रांनी (आणि श्रीकृष्णांनी सुद्धा ) आपल्या नागरिकांना आपल्या सोबत (त्यांच्या रक्षणासाठी) विमानात बसवून नेले. असा हा परमेश्वर (राम) तुझी कधीही उपेक्षा करणार नाही.

(ब्रीद – प्रतिज्ञा, रिपु – शत्रू, कांबी – धनुष्याची कांबीट/कामठा, पुरी – नगरी)



विवेचन : मागील श्लोकात समर्थांनी धनुष्य धारण (कोदंडधारी) केलेला राम आपल्या भक्तांच्या रक्षणार्थ कसा सज्ज आहे हे सांगितले. या श्लोकामध्ये भक्तांचे रक्षण करणे हे परमेश्वराचे ब्रीदच आहे हे समर्थ परत ठामपणे आपल्या मनावर बिंबवतात.

सज्जनांच्या रक्षणासाठी आणि दुर्जनांच्या निर्दालनासाठी भगवंत अवतार धारण करतात. जगामध्ये सामान्य माणसे, संत महंत आणि परमेश्वराचे कार्य करण्यासाठी अवतार धारण केलेली अशी तीन प्रकारची माणसे असतात. सामान्य माणूस आपल्या चांगल्या कर्माच्या सहाय्याने स्वउद्धार करून घेऊ शकतो. संत महंत आपल्या आयुष्यामध्ये धर्माची प्रतिष्ठापना करणे आणि समाजातील भक्ती किंवा सात्विकता वाढवणे असे कार्य करीत असतात. ते लोकांना ईश्वर प्राप्तीच्या मार्गावर आणण्यासाठी मार्गदर्शन करतात. परंतु दृष्टांचे निर्दालन करणे त्यांना शक्य होत नाही. ज्ञानेश्वर माऊलींनी सुद्धा

जे खळांची व्यंकटी सांडो ।
तया सत्कर्मी रती वाढो ।।

असे म्हटले आहे. म्हणजे दुष्टांचे दुष्टत्व किंवा वाईट भावना नष्ट होवोत आणि सत्कर्म करण्याकडे त्यांची आवड वाढो.

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतम् ।
धर्मसंस्थापनार्थामि युगे युगे ।।

हे भगवंताने आपल्या भक्तांना गीतेत दिलेले वचन आहे. जे लोक परमेश्वराची भक्ती करीत नाहीत अशा लोकांना सुद्धा तो कधी शासन करत नाही. तो तर अजातशत्रू आहे. पण पण जर कोणी त्याच्या भक्ताला त्रास देत असेल तर ते मात्र तो सहन करू शकत नाही आणि त्याच्या रक्षणासाठी धावून येतो. परमेश्वर आपल्या भक्तांच्या रक्षणासाठी तो अवतार घेतो. **(क्रमशः)**




ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏


## सुविचार - प्रकाश



प्रकाश शिवाजी भोंगाळे
मायणी ता खटाव जि सातारा
मो नं 9271686230

माणसे सहज बोलून जातात या जगात कोणी कोणाचे नाही. पण स्वतःला विचारायचे विसरून जातात की, आपण कोणाचे आहोत. माणसांनी माणसांबरोबर, माणसांसारखे वागून परस्परांना सुखी करण्याचा प्रयत्न करणे हीच आहे देवाची भक्ती-उपासना आणि तोच आहे खरा धर्म. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन जीवन जगण्यात खरे शहाणपण आहे.

## त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

सदाचरणाने राहणाऱ्या माणसाला खर्च कमी लागतो, कारण खऱ्या समाधानाने पोट भरले की अन्नही कमी लागते. मी हे वारंवार सांगतो, कारण सदाचरणाचे, नीतिधर्माचे आचरण, हा परमार्थाच्या इमारतीचा पायाच आहे. पाया भक्कम नसेल तर त्यावरची इमारत जास्त दिवस टिकू शकणार नाही. त्याप्रमाणे नीती जर सांभाळली नाही, तर पुढच्या कर्माचा फारसा उपयोग होत नाही. परस्त्री मातेसमान माना, परद्रव्याची अभिलाषा बाळगू नका आणि परनिंदेला विष्ठा समजून त्याग करा. या तीन गोष्टींना फार सांभाळा. परमार्थाची इमारत या तीन गोष्टींवर उभी करायची आहे. नुसता पाया बांधून ज्याप्रमाणे घरात राहता येत नाही, त्याप्रमाणे पायाशिवाय इमारतही उभी करता येत नाही. 'राम कर्ता' ही भावना ठेवून नामात राहणे, म्हणजे परमार्थरूपी इमारतीत आनंदात राहणेच होय. व्यावहारिक मोठेपणा बाजूला ठेवा आणि देवाला अनन्यभावाने शरण जा. देवाला शरण जाताना सर्व विसरून जा. समजा, एखादा माणूस नाटकात राजाचे काम करीत असला आणि नाटक संपल्यावरही तो घरी घेऊन जर राजासारखे वागू लागला, तर त्याचा सर्व व्यवहार बिघडून जाईल; त्याचप्रमाणे, देवाला शरण जाताना, मी मोठा भक्त, विद्वान्, पैसेवाला ही सर्व नाती विसरून गेले पाहिजे.

कर्माचे फळ आपल्या हातचे नाही म्हणून त्याची काळजी करू नये, हे समजले तरी, काळजी न करणे हे देखील आपल्या हातचे नाही म्हणून आपण काळजी करतोच ! यासाठीच भगवंताच्या नामात राहण्याची सवय करा. कर्म करणे यात विशेष नाही. आपल्याला कर्म केल्याशिवाय चैनच पडत नाही. 'कर्म करा' असे गीतेतही सांगितले आहेच. परंतु कर्म केल्याने पाहिजे ते फळ आपल्याला मिळतेच असे नाही; म्हणून भगवंताला स्मरून कर्म करा, आणि मग काय काय होते ते पहा. तेच निष्काम कर्म. भगवंताच्या इच्छेने सर्व घडते आहे ही भावना ठेवून आपले कर्तव्य करणे, हे सर्व गीतेचे सार आहे.

जो समजून त्याग करील त्याला फायदा होईल. नाहीतरी, संन्यास आणि त्याग दोन्ही आपल्याजवळसुद्धा आहेत. भगवंताच्या बाबतीत आपण संन्यासी वृत्ती धारण करतो आणि आपण आपल्या आईबापाला सोडतो असा त्याग करतो ! हे काय कामाचे ? त्याग हे यज्ञाचे खरे मर्म आहे. भगवंताच्या प्राप्तीच्या आड जे जे येते ते ते टाकणे, म्हणजे यज्ञ करणे होय. या यज्ञामध्ये वासनांची आहुती द्यावी. कोणत्याच गोष्टीबद्दल हवे अगर नको असे न वाटणे, हेच वासनांची आहुती दिल्याचे लक्षण आहे.

जेथे वासना संपली तेथेच भगवंताची कृपा झाली.

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

### ♦अहंकार♦

पुढे........

तुकाराम महाराज येथे म्हणतात मी पूर्वी अहंकार व्याप्त होतो त्याचा जेव्हा मी त्याग केला, म्हणजे अहंकार लीन केला. न्यूनतम अवस्थेत नेला. तेव्हाच मला मुक्ती ,मोक्ष मिळाला. आणि माझ्या जन्म मरणाचे सुतक फिटले. कारण जन्म मरण या बंधनात अहंकार मोठी भूमिका बजावतो.

संत सेना यांचाही एक अभंग आता पाहू

आम्ही वारिक वारिक/ करू हजामत बारीक/ विवेक दर्पण आयणा दावू /वैराग्य चिमटा हलवू /उदक शांती डोई घोळू/ अहंकाराची शेंडी पिळू/ भावार्थाच्या बगला झाडू /काम क्रोध नखे काढू/ चौवर्णा देऊनी हात/ सेना राहिला निवांत//

हजामतीचे रूपक वापरून संत सेना किती मोठा दिव्य अनुभव येथे सांगतात ते पहा. ब्रह्मज्ञान विना म्हणजे आत्म्याचा अनुभव प्रत्यक्ष आल्याशिवाय विवेकाचा जन्म होत नाही. हा विवेकाचा आरसा पाहू. वैराग्याचा चिमटा हलवू. म्हणजे संपूर्ण शरीरात वैराग्य भरून पावायला हवे. तेव्हाच शांतीचा अनुभव येतो. शांतीचे रसायन सहस्त्रार चक्रामध्ये स्त्रवते. अहंकाराची शेंडूही पिळू म्हणजे तो न्यूनतम अवस्थेत आणू. काम क्रोध इत्यादी विकार काढून टाकू. हे सर्व साधना अवस्थेत आपोआप येणाऱ्या स्थिती आहेत. येथे स्वतःहून कोणतीही गोष्ट करावयाची नसते. तर कुंडलिनी जागृती नंतर साधना रत राहिल्यास नंतर या स्थिती आपोआप येतात,व अहंकार न्यूनतम अवस्थेत गेला की योगग्नी पेटतो. प्राण उर्ध्व रेता होऊन बुद्धीमध्ये विसावतो. बुद्धी कुंठीत होते. याचा अर्थ ती विषयाबद्दलचे तर्क, कल्पनांचे धुमारे पल्लवीत करीत नाही व ती आकुंठित होऊन आत्म्याकडे वळते.

क्रमशः......

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### ♦अभिवादन मदर ला

जागतिक मदर डे, म्हणून आजच्या आपल्या तरंग मधे सर्व माताबहिणीचे, मायचे स्मरण करणे आपले कर्तव्य आहे. नुसते कर्तव्यच नाही तर महिला वर्गाप्रती एक सद्भावना व्यक्त करावी
म्हणून आज आई बद्दल लिहिले आहे! "प्रेमस्वरूप आई, वात्यल्यसिन्धू आई.." आईविना माणूस त्रीजगती भिकारी,"ज्या मातेने हे जग दाखविले, नवमहिने ऊदरी सांभाळून जीवन दिले आणि
क्षणोक्षणी लहानाचे मोठे होत असताना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले, वाढविले,
तिचे उपकार न फेडण्यासारखे आहे! आई एक नाव असतं, घरातल्या घरात गजबजलेलं गाव असतं, किंवा आईची शिदोरी जन्मभर सरतही नाही आणि ऊरतही नाही" असं फ.मू.म्हणतात, ते 100% खरं आहे. आई म्हणून स्त्रीचे महत्व तर आहेच पण एक महिला म्हणून तिचं योगदान खूप मोठं आहे हे आपण विसरतो असं मला वाटतं. निसर्ग चक्राशी एकरूप माय ते आजची रणरागिणी हा जीवनपटही खूप बोध देतो.
सर्जनशीलता, सहनशिलता, सोशिकता आणि कुटुंबाचा कणा म्हणून एक "मदर" खूप मोठी आहे, तिचा आवाका खूप मोठा आहे! देवदेवता बरोबर माहेर, सासर नातीगोती, घरदार आणि आयुष्यातीलसंघर्ष करणारी एक महिला म्हणून तिचं महत्व वेदपुराण काळापासून ते आतापर्यंत टिकून आहे! पुर्वी तर स्त्रियाना शिक्षणाची संधी नव्हती, सिद्ध करायला कॅनव्हास नव्हता, गॅलरी नव्हती ना नोकरी तरी स्त्री थांबली नाही.. आणि आज आपण पाहतो आहे, सर्व क्षेत्रात त्या मानाने, स्वाभिमानने जगत आहेत आणि कुटुंब समाजा बरोबरच देशाप्रति वचनबध्द राहून योगदान देत आहेत.. आज एवढे पुरे. तुर्त थांबतो. स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा.



## आरोग्य संजीवनी

## झोपण्याअगोदर का दूध प्यायला हवेच

ज्योतिर्मय साहित्य

खूप स्त्रियांना आणि आईंना दूध आवडत नसते. पण काही मातांना ते आवडत असते. पण दूध हे आवडत असेल किंवा नसेल तरीही प्यायला हवे. कारण दूध हे शाकाहारी आहे आणि खूप काही पौष्टिक घटक त्यातून मिळत असतात. त्यामुळे तुमचे शरीर तर सशक्त होतेच पण होणाऱ्या किंवा झालेल्या बाळाला खूप लाभदायक आहे. ह्यातून तुम्हाला खूप सारे पौष्टिक घटक मिळतात. लहान बाळासाठी पूर्णान्न असलेले दूध. दुधात आयर्न, मॅग्नेशियम, मँगेनीज, तांबे, पोटॅशियम, सेलेनियम, झिंक, फॉस्फरस ही खनिजे उत्तम प्रमाणात उपलब्ध असतात. एक कप जरी दूध घेतले तरी तुम्हाला त्यातून १३० कॅलरीज मिळतात.

शांत व गाढ झोप लागण्यासाठी कोमट दूध घेतलेले बरे. कोमट दूध प्यायल्याने खूप गाढ झोप लागत असते. पण ह्यासोबतच इतरही फायदे तुम्हाला मिळतात ते ह्या माहितीमधून बघू.

रात्री झोपताना दूध प्यायले तर तुमचे पोट भरलेले राहते आणि तुम्हाला लवकर भूक लागत नाही. त्यामुळे तुम्हाला वजन कमी करायचे असल्यास रात्री झोपताना दूध पिणे हा उत्तम पर्याय ठरु शकतो. प्रक्रिया केलेले दूध पिणे जास्त चांगले.



कोमट दूध प्यायल्याने शरीरातील स्नायू शिथिल होण्यास मदत होते. स्नायू शिथिल झाले की शांत आणि चांगली झोप लागते. त्यामुळे झोपण्यापूर्वी कोमट दूध पिणे गाढ झोप लागण्यासाठी उपयुक्त असते. आणि ॲसिडिटी वरती थंड दूध खूप लाभदायक ठरत असते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

दूधामध्ये असणाऱ्या पोटॅशियममुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. रक्तदाब नियंत्रित राहील्यास हृदयावर ताण येत नाही आणि हृदयाशी संबंधित तक्रारी उद्भवण्यापासून आपली सुटका होऊ शकते.

आणि जर तुम्हाला खोकला किंवा कफ किंवा सर्दीही असेल तर तुम्ही आयुर्वेदाप्रमाणे दूधामध्ये हळद टाकून दूध प्यायला हवेच. आले टाकून प्यायल्यास प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. विविध कारणांनी होणाऱ्या व्हायरल इन्फेक्शनपासून शरीराचे संरक्षण करण्यासाठी हे उपयोगी ठरते.

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

विषय :- आई

तुझ्याशिवाय आई मज
करतमत मुळीच नाही
तू समोरी असावे
गप्पा,गोष्टी सुरु
जेवन करुन छान
कुशीत तुझ्या निजावे

रखरखत्या उन्हात या
तुझ्या कुशीतच मिळे
जीवास माझ्या विसावा
तुझ्या सुंदर अंगाईने
ओठी हास्य फुलता
मनी आनंद पाझरावा

# किरण तोडकर यांना ''पद्मश्री डॉ मणिभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्कार'' प्रदान



**ज्योतिर्मय साहित्य**

सातारा - सातारा जिल्ह्यातील नहरवाडी गावचे सुपुत्र कवी, लेखक, समिक्षक किरण तोडकर सुर्यवंशी यांची ''पद्मश्री डॉ. मणिभाई देसाई राष्ट्रसेवा अवार्ड २०२६'' देण्यात आला आहे.

डॉ. मणिभाई देसाई प्रतिष्ठान, उरळी कांचन (पुणे) यांच्या वतीने तसेच मा.पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आरंभीत केलेल्या नीती आयोग, भारत सरकार, राष्ट्र सेवा समिती महाराष्ट्र राज्य वतीने, नीति आयोग, भारत सरकार व एमएसएमई मंत्रालयाशी संलग्न राष्ट्रीय सेवा उपक्रमांतर्गत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

सामाजिक, साहित्यिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, राष्ट्रीय एकात्मता आणि समाजसेवेतील योगदानाची दखल घेत किरण तोडकर सुर्यवंशी यांना प्रदान करण्यात आला आहे.

सदर पुरस्कार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व ज्येष्ठ समाजसेवक, प्रवचनकार डॉ. रवींद्र भोळे ,व खादी आणि ग्रामोद्योग मंत्री मा.श्री. रविंद्र जी साठे इतर वरिष्ठ मान्यवर यांच्या हस्ते २७ एप्रिल २०२६ रोजी पुणे येथे सावित्रीबाई फुले स्मारक सभागृहात प्रदान करण्यात आला असून, राष्ट्रसेवेची जाणीव व सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार बहाल करण्यात आला.

किरण तोडकर सुर्यवंशी हे कवी व लेखक असून त्यांची चार पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तसेच गेले २३ वर्ष ते राज्यभर साहित्यिक, सामाजिक क्षेत्रात काम करत आहेत व पलपब प्रकाशन संस्था अहमदाबाद या प्रख्यात साहित्यिक संस्थेत महाराष्ट्र अध्यक्ष म्हणून कार्य करत आहेत मा.सौ.लीना ताई पाटील (पलपब सर्वेसर्वा) यांच्या नेतृत्वाखाली व आयोजनात ६ राज्यस्तरीय एक दिवसीय साहित्य संमेलने यशस्वीपणे पार पाडली आहेत.किरण तोडकर हे अनेक साहित्यिकांना घडविण्याचे काम करत आहेत, शेती क्षेत्रात तोडकर यांनी कवीराज ७१ या गहू जातीचा संशोधन करून शोध लावला असून राज्यस्तरीय पाच व राष्ट्रीय ३ पुरस्कार प्राप्त झाले आहेत. किरण तोडकर सांगतात त्यांना हे सर्व यश त्यांच्या कवितांनी, मित्रांनी आणि पलपब प्रकाशन संस्था व संस्थेच्या सर्वेसर्वा लीना ताई पाटील यांच्यामुळे शक्य झाले.कवी किरण तोडकर यांनी सात पुस्तकांना प्रस्तावना लिहिली आहे. तसेच ते त्यांच्या लिखाणातून व समाजकार्य तून प्रेरणा, संदेश देण्याचे काम करत असतात .या सर्व गोष्टींची नोंद घेऊन ''पद्मश्री डॉ मणिभाई देसाई उरुळी कांचन प्रतिष्ठानने अत्यंत प्रतिष्ठेचा हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या बद्दल कवी किरण तोडकर यांनी मा.श्री.रविद्रजी भोळे सर यांचे व पद्मश्री डॉ मणिभाई देसाई प्रतिष्ठान यांचे आभार मानले तसेच राज्य, देशातून विविध स्तरांतून कवी किरण तोडकर सुर्यवंशी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.पुरस्कार स्विकारताना कवी प्रतिक मतकर, कवी प्रवीण काळकुटे , कवी विजय कदम, कवयित्री वैशाली महाडिक, कवयित्री संगिता साळुंखे मा रविंद्र शिंदे, मा ओंकार घाडगे,उपस्थित होते याबद्दल किरण तोडकर यांनी सर्वांचे आभार मानले.

# साहित्य भारतीच्या प्रांताध्यक्षपदी प्रा.डॉ. सर्जेराव जिगे

## कार्याध्यक्षपदी उमेश काळे, युवराज नळे प्रांत महामंत्री



**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारतीच्या देवगिरी प्रांताध्यक्षपदी सुप्रसिध्द साहित्यिक प्रा. डॉ. सर्जेराव जिगे यांची तर कार्याध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार उमेश काळे, प्रांत महामंत्रीपदी धाराशिवचे जेष्ठ साहित्यिक युवराज नळे यांची निवड करण्यात आली.

देवगिरी प्रांत कार्यकर्त्यांची शनिवारी (दि.९) आभासी बैठक झाली. या बैठकीला मराठवाडा आणि खान्देशातील शंभरावर प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत प्रदेश संघटनमंत्री नितीन केळकर, प्रदेश कार्याध्यक्ष शशीकांत घासकडबी, प्रदेश उपाध्यक्ष प्रा. रवींद्र बेंबरे यांनी मार्गदर्शन केले. प्रांताचे माजी अध्यक्ष प्राचार्य संजीव गिरासे यांनी मनोगत मांडले. प्रांत कार्यकारिणीची घोषणा नितीन केळकर केली.

नूतन प्रांत कार्यकारिणी - अध्यक्ष प्रा. डॉ. सर्जेराव जिगे, छ. संभाजीनगर, कार्याध्यक्ष उमेश काळे, छ. संभाजीनगर, प्रांत महामंत्री युवराज नळे, धाराशिव. उपाध्यक्ष प्रा. डॉ.राजीव यशवंते, हिंगोली, द.ल. वारे, बीड, कोषाध्यक्ष डॉ. नागेश अंकुश, छत्रपती संभाजीनगर, कार्यालय मंत्री विलास फुटाणे, छ. संभाजीनगर, युवा विभाग प्रा. डॉ. रमेश रावळकर, छ. संभाजीनगर, लोकसाहित्य विभाग प्रा. डॉ. योगेश पाटील, धुळे, बाल साहित्य विभाग संगीता धारूरकर, छ. संभाजीनगर,प्रचार, प्रसिद्धी, सोशल मीडिया प्रा डॉ. सुहास सदाव्रते, जालना, महिला विभाग - प्रा. डा. उषा शर्मा, जळगाव, अनुराधा पत्की नांदेड.

# चिमुकल्यांनी जिंकली उपस्थितांची मने, कलारंग उन्हाळी शिबिराचा समारोप



**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - सिडकोतील कलारंग उन्हाळी शिबिराची बच्चे कंपनीने विविध सांस्कृतिक आविष्कार सादर करून उत्साहात सांगता झाली. यानिमित्त आयोजित शिबीर समारोप समारंभास परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मी होणार सुपरस्टार फेम निषाद देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात ईश्वरी गोगटे हिच्या मंगलमय गणेश वंदनेने झाली. शिबिरातील बालकलाकारांनी आपल्या अंगी असलेल्या विविध कलागुणांचे अप्रतिम सादरीकरण करत उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळविली. ईश्वरी, ऋजुता व अधिरा यांनी कविता गायन सादर केले. छोट्या जयेशने गोष्ट सादर करून सर्वांची मने जिंकली. शौनक तसेच अभिदा यांनी नाट्यछटा सादर करून उपस्थितांची वाहव्वा मिळवली. यासोबतच प्रार्थना, गीत आणि नृत्याचे सामूहिक सादरीकरणलाही उपस्थितांकडून प्रतिसाद मिळाला.

हरिनामाची शाळा भरली...

हरिनामाची शाळा भरली या समूह भक्तीगीतावर उपस्थितांनी आपसूकच ठेका धरला, इतके अप्रतिम बालकलाकारांनी हे गीत सादर केले. बालकलाकारांच्या विविध कलाविष्कारांनी वातावरण भारावून गेले होते.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. विनोद सिनकर, सुधीर कोर्टीकर आणि डॉ. शेषराव पठाडे यांनी शिबिरार्थींना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. बालकलाकारांना संस्कार आणि आत्मविश्वासाचे महत्त्व पटवून दिले. बालकलाकारांनी सादर केलेल्या कलाविष्काराची पाहुण्यांनी मुक्तकंठाने प्रशंसा करून भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक सारिका कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन वैशाली जोशी यांनी, तर आभार प्रदर्शन रेणुका मोहरीकर यांनी मानले. कार्यक्रमाचे व्यवस्थापन प्रसाद जोशी यांनी पाहिले.




# आनंदाचा बटवा आणि आय एम द बेस्ट या पुस्तकांचे शानदार प्रकाशन

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - सार्वजनिक जीवनात जगताना सर्वांना सोबत घेऊन काम करा, मन मोठं करा, ज्याचं मन मोठं तो जग जिंकू शकतो हे सुत्र लक्षात ठेऊन जीवनाची वाटचाल करा असे प्रतिपादन ह.भ.प. डॉ. पुष्कर महाराज गोसावी यांनी केले. पिंपरी चिंचवड येथील काव्य मित्र संस्थेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज, प्रख्यात कवी ग्रेस यांची जयंती आणि विचारवंत ना. य. डोळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित पुस्तक प्रकाशन आणि राष्ट्रीय युवा चेतना पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. रविवार दि. १० रोजी सकाळी तारांगण ऑडिटोरिअम येथे झालेल्या या शानदार कार्यक्रमास व्यासपीठावर प्राधिकरण नागरी सुरक्षा कृती समितीचे अध्यक्ष डॉ. विजय पाटील, कवी संजय होनकळस, कवी बापू केंगळे आणि महात्मा गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्हि.पी पवार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचा प्रारंभ दिपप्रज्वलन तसेच संत तुकाराम गाथा आणि भारतीय संविधान पुस्तकाच्या पुजनाने करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते आनंदाचा बटवा हा काव्यसंग्रह आणि आय एम द बेस्ट या कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले. तत्पुर्वी अंकिता कसबे हिने देशभक्तीपर गीत सादर केले तर शुभम नरवडे याच्या काव्यवाचनाला उपस्थितांनी दाद दिली. संजय जगताप यांनी दोन्ही पुस्तकांसंदर्भात मनोगत व्यक्त केले. पुस्तक प्रकाशन सोहळ्यानंतर पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे नुतन अध्यक्ष सागर सुर्यवंशी तसेच संत एकनाथ महाराजांचे वंशज ह.भ.प.डॉ. पुष्कर गोसावी आणि आरटीओ इन्स्पेक्टर किरण बनसोडे यांना राष्ट्रीय युवा चेतना या पुरस्काराने गौरविण्यात आले.

उत्तम माने आणि प्रकाश गायकवाड यांना कवी ''ग्रेस'' तर शिवाजी नाईकवाडी, पुष्पक कांदळकर, डॉ.वंदना पाटील, सुनील कांबळे यांना ''ना.य. डोळे'' हा पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुप्रिया जोगदंड हिने केले. हरिनाथ कांबळे यांनी आभार मानले. काव्य मित्र संस्थेचे संस्थापक राजेंद्र सगर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# मनोज अग्रवाल यांना यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार जाहीर

**ज्योतिर्मय साहित्य**



छत्रपती संभाजीनगर : येथील कवी, लेखक व कथाकार मनोज अग्रवाल यांना के.एस.इ. प्रकाशन कोल्हापूर तर्फे दिला जाणारा यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. सदरील पुरस्कार कोल्हापूर येथील करवीर वाचन मंदिर येथे होणाऱ्या सोहळ्यात देण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. साहित्य क्षेत्रातून मनोज अग्रवाल यांच्यावर यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार जाहीर झाल्यामुळे अभिनंदन वर्षाव होत आहे.

दिनांक १७ मे २०२६ रोजी मनोज अग्रवाल यांना कोल्हापूर येथे करवीर वाचन मंदिर सभागृह येथे हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. मनोज अग्रवाल यांनी आतापर्यंत अनेक कविता, कथा आणि शैक्षणिक व सामाजिक विषयावर लेख लिहिलेले आहेत. त्यांचा चैतन्यवेल काव्यसंग्रह प्रकाशित आहे. चैतन्यवेल काव्यसंग्रहाला अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. सदरील पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शैक्षणिक, साहित्य,सामाजिक क्षेत्रातील अनेक व्यक्तींकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच नातेवाईक व मित्र परिवार यांच्याकडूनही त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# आनंदयात्री रवींद्रनाथ

**लेखक - श्री. विश्वास देशपांडे**
**ग्रंथ परिचय -विभावरी कुलकर्णी**
**पुणे. मो. 8087810197**

आनंदयात्री रवींद्रनाथ या पुस्तकाला नुकताच तितीक्षा इंटरनॅशल, पुणे यांचा उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार प्राप्त झाला आहे. रवींद्रनाथ यांचे एक एक पैलू लेखकाने या ग्रंथात उलगडले आहेत सर्वांनी वाचावा असा हा ग्रंथ आहे.

- आकर्षक मुखपृष्ठ - रवींद्रनाथ यांचा गूढ, गहन वाटणारा परंतु शांत, निश्चयीपणा दर्शविणारा फोटो आणि एकला चलो रे हे वाक्य अतिशय अर्थपूर्ण आहे. आकर्षक रंगातील मुखपृष्ठ व प्रस्तावनेतील मोजकी वाक्ये घेऊन सजलेले मलपृष्ठ ! पुस्तक उघडण्यापूर्वीच त्याची व्यापकता दर्शवतात. त्यानंतर पुस्तकातील 'अर्पणपत्रिका - ज्यादोन आनंदयात्रींना समर्पित केली आहे, त्यांच्या फोटोसह दिसते प्रस्तावनेच्या शेजारील पानावर रवींद्रनाथ यांचा जो फोटो आहे, त्यातील डोळे फारच बोलके व संदेश देणारे आहेत. मा. डॉ. नरेंद्र जाधव यांची प्रस्तावना पुस्तक व लेखक यांच्या विषयी अत्यंत महत्वाची माहीती सांगते. आवर्जुन वाचावी अशी सुलभ भाषेतील प्रस्तावना! त्यानंतर मा. लेखक यांचे मनोगत वाचायला मिळते. मनोगत वाचताना लेखकांचा प्रामाणिकपणा, ऋणनिर्देश विशेष जाणवतात. पुस्तका इतकेच वाचनिय मनोगत आहे. पुढील पानावर जी अनुक्रमणिका वाचायला मिळते, ती बघून थोडे आश्चर्य वाटते, जर पुस्तकच 'रवींद्रनाथ' यांच्या विषयी आहे, तर अनुक्रमणिका का दिली असेली परंतू ती वाचल्यावर लक्षात येते, हे तर त्यांचे विविध पैलू आहेत. त्या त्या लेखात त्या पैलूचे दर्शन घडते.
- कौटुंबिक पार्श्वभूमी - रवींद्रनाथ कसे घडले, त्यांच्यावर कोणते संस्कार झाले हे समजण्यासाठी कौटुंबिक पार्श्वभूमी महत्वाची ठरते. नव्यातील चांगले स्वीकारणे व जुन्या कालबाह्य गोष्टींचा त्याग या साठी लागणारा डोळस विवेक या कुटुंबात होता. इंग्रज प्रवाहात वाहून न जाता स्वयंप्रज्ञ वागणे कसे असावे हे वाचणे महत्वाचे आहे.
- समृद्ध सांस्कृतिक पार्श्वभूमी - सगळे कुटुंब विविधकलांचे भोक्ते होते. व प्रत्येक व्यक्तीजवळ कोणतीतरी कला होतीच. हेच संस्कार रवींद्रनाथ यांच्यावर झाले.
- व्यक्तीमत्वाची जडण घडण - या लेखात त्यांच्या मनावर उत्तम संस्कार कसे घडले आणि शांतीनिकेतन विषयी महत्वाची माहीती गोष्टरूपाने समोर येते. हे पालकांनी आवर्जुन वाचायला हवे.
- शांतिनिकेतनच्या स्थापनेमागील विचार - रवींद्रनाथ यांचे विचार कसे घडत गेले, अनुभवातून ते काय व कसे शिकले शाळेविषयीचे त्यांचे मत आणि त्यातून आकाराला येणार विचार लक्षात येतात.

क्रमश:.......



# कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495

मागील अंकावरून पुढे......

क्षणक्षणी स्मरिन देवा, नाम तुझे गोड ।
कणकण साचुनी भक्ती, होई जीवन थोड ॥३॥
उद्योगी हाति कर्म माझे, अर्पिन तुजपाशी ।
कर्ता तूचि अंतर्यामी, मी निमित्ताशी ॥४॥
चातुर्य, दया, क्षमा, शांती, भूषणे जीवनाची ।
अंतरी तुझीच वस्ती, वाटचाल सत्याची ॥५॥
सत्य + प्रेम = योग्य वाणी
प्रत्येक क्षणात देवस्मरण कर्म देवाला अर्पण
अंतःकरण शुद्ध ठेवणे
सगळे माझे बंधु होती, सर्वांमध्ये तू वसे ।
सत्य-प्रेम-विवेकाने, जीवन माझे फुले ॥
कर्म तुज अर्पूनि देवा, अहंकार नाही ठसे ।
क्षणक्षणी तुझ्या स्मरणे, आत्मज्ञान उजळे ॥

- १. वसुधैवकुटुम्बभावः

न ममायमिति भ्रान्तिर्न तवायमिति स्थितिः ।
एकात्मभावसम्पन्ने विश्वं कुटुम्बमिष्यते ॥
भावार्थ - "हा माझा–तो तुझा" असा भेद अज्ञानातून निर्माण होतो. ज्याला एकात्मभावाची अनुभूती होते, त्याच्यासाठी संपूर्ण विश्व कुटुंब बनते।

- २. हितसत्यवाणी

सत्यं ब्रूयात् सुधासारं हितमुक्तिं प्रसादिनीम् ।
न कटुं नानृतं वाक्यं साधोर्वाणी विभूषणम् ॥
भावार्थ : सत्य हे अमृतासारखे, हितकारक आणि प्रसन्न करणारे असावे। कटु किंवा असत्य वाणी न बोलणे — हे सज्जनांचे खरे भूषण आहे।

- ३. क्षणकणसाधना

क्षणेन क्षीयते कालः कणेन क्षीयते धनम् ।
तस्मात् सजगचित्तेन साधनीयं शुभं ध्रुवम् ॥
भावार्थ : क्षणाक्षणाने वेळ कमी होत जातो आणि कणाकणाने धन कमी होते। म्हणून जागरूक चित्ताने सतत शुभ साधना करावी।

- ४. कर्मार्पणभावः

कर्तृत्वाभिमनो हीनः कर्म कुर्वन्नशेषतः ।
ईश्वराय समर्प्यैव मुक्तिं लभते मानवः ॥
भावार्थ : कर्तेपणाचा अभिमान सोडून, सर्व कर्म ईश्वराला अर्पण केल्याने मनुष्य मुक्ती प्राप्त करतो।

- ५. गुणभूषणम्

न भूषणं हि भूषणैः गुणा एव विभूषणम् ।
दया-शान्ति-विवेकाढ्यं जीवनं शोभते सदा ॥
भावार्थ : खरे भूषण दागिने नसून गुण आहेत।
दया, शांती आणि विवेक यांनी युक्त जीवनच खरे शोभून दिसते।

- एकत्रित महाश्लोक (साररूप)

एकात्मभावसंयुक्तं सत्यहितप्रवाचकम् ।
क्षणकणोपचितं ज्ञानं कर्मार्पणविभूषितम् ॥
दया-शान्तिविवेकाढ्यं जीवनं मुक्तिदायकम् ॥

■ ■ ■

# जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज अभंगलेखन हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत अभिज्ञान, पुणे यांच्या वतीने ''जगद्गुरू संत तुकाराम महाराज अभंगलेखन हस्ताक्षर स्पर्धा'' आयोजित करण्यात आली आहे. संत साहित्याची गोडी, सुंदर हस्ताक्षराची जपणूक आणि विद्यार्थ्यांमध्ये संस्कारमूल्यांची रुजवण या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या स्पर्धेत बालगटापासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना सहभागी होता येणार असून स्पर्धा चार गटांमध्ये घेण्यात येणार आहे. तसेच कट निब्ज गटाचाही वेगळा समावेश करण्यात आला आहे. स्पर्धकांनी दिलेल्या निवडक ९ अभंगांपैकी कोणतेही ४ अभंग स्वतःच्या हस्ताक्षरात एका कागदावर लिहून त्याचा फोटो द्वारे पाठवायचा आहे.

स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क रुपये १२० निश्चित करण्यात आले असून लेखनाचा फोटो आणि शुल्क भरल्याचा स्क्रीनशॉट दि. २७ मे २०२६ पर्यंत पाठविणे आवश्यक आहे. स्पर्धेचा निकाल दि. २६ जून २०२६ रोजी जाहीर करण्यात येणार असून विजेत्यांना गौरवपत्रे आणि मेडल्स प्रदान करण्यात येणार आहेत. तसेच सर्व सहभागींना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी इच्छुकांनी अभिज्ञान, पुणे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

संपर्क : ७२४९१२२४२८ / ९८५००७४४१८

ऑनलाईन औषधोपचार



आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

# सावित्रीच्या लेकिंचे प्रेरणादायी यश!

**ज्योतिर्मय साहित्य**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. राज्याचा बारावीचा निकाल ८९.. ७९ टक्के लागला. नेहमीप्रमाणे कोकण विभागाने या निकालात बाजी मारली. कोकण विभागाचा ९४ . १४ टक्के निकाल लागला असून कोकण विभागाने राज्यात अव्वल स्थान पटकावले असून लातूर विभाग निकालात तळाशी राहिला आहे. लातूर विभागाचा निकाल ८४.१४ टक्के इतका लागला आहे. लातूर विभाग टक्केवारीत सर्वांचा मागे पडला हे या निकालातून स्पष्ट दिसते. मागील दशकात लातूर विभाग हा दहावी बारावीच्या निकालात सातत्याने अग्रस्थानी राहिला आहे. लातूर पॅटर्न हा दहावी बारावीच्या निकालासाठी राज्यात प्रसिद्ध होता. आताही नीट आणि जेईई परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांची पसंती लातूरलाच असते. नीट आणि जेईईची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांची पहिली पसंती पुणे, दुसरी पसंती लातूर तर तिसरी पसंती बारामती ही आहे. ज्यांना शक्य आहे ते पालक आपल्या पाल्यांना राजस्थानातील कोटा येथेही पाठवतात मात्र महाराष्ट्रात लातूर पॅटर्नने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली असताना लातूरची निकालात इतकी घसरण होणे हे आश्चर्यकारकच आहे. अर्थात निकालात घसरण फक्त लातूर विभागाची झाली असे नाही तर संपूर्ण राज्याचा निकाल यावर्षी घसरला आहे. यावर्षी राज्याचा निकाल ८९.७९ टक्के लागला. जो मागील वर्षीच्या तुलनेत २.०९ टक्क्यांनी कमी आहे. मागील वर्षी म्हणजे २०२५ साली बारावीचा निकाल ९१.८८ टक्के होता. यावर्षी बारावीचा निकाल का घसरला ? असा प्रश्न विचारला जात आहे. यावर्षी राज्य सरकारने कॉपी मुक्त परीक्षा अभियान राबवले त्यामुळे हा निकाल घसरला असण्याची शक्यता आहे. अर्थात हे चांगलेच झाले. कॉपीमुक्त परीक्षा या अभियानामुळे राज्याची खरी गुणवत्ता समोर आली. मध्यंतरी राज्याचा निकाल हा ९७ ते ९९ टाक्यांच्या दरम्यान असायचा आणि त्यात शेकडो विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळायचे. सरकारने कॉपीमुक्त परीक्षा हे अभियान राबवल्या मुळे कॉपिला काही प्रमाणात आळा बसला आहे. सरकारने हे अभियान यापुढेही चालू ठेवावे. विद्यार्थ्यांनी कॉपिवर अवलंबून न राहता वर्षभर नियमितपणे अभ्यास करावा कारण काळ झपाट्याने बदलत आहे. आता शिक्षणातही तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. आज उत्तरपत्रिका शिक्षक तपासित आहेत पण भविष्यात या परीक्षांच्या उत्तरपत्रिका ए आय च्या मदतीने तपासल्या जातील. जेंव्हा ए आय तंत्रज्ञान वापरून उत्तरपत्रिका तपासल्या जातील तेंव्हा निकाल आणखी घसरण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचे तंत्रस्नेही शिक्षक दिसले गुरुजींनी गेल्या वर्षी त्यांच्या वर्गाच्या उत्तरपत्रिका ए आय तंत्रज्ञान वापरून तपासल्या. ए आय तंत्रज्ञानाने अवघ्या काही सेकंदात एक उत्तर पत्रिका तपासून होते हे त्यांनी दाखवून दिले त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर भविष्यात उत्तर पत्रिका तपासण्याकरिता होणार हे नक्की त्यामुळे यापुढे विद्यार्थ्यांना अभ्यासाशिवाय गत्यंतर नाही. अर्थात राज्याचा एकूण निकाल घसरला असला तरी या निकालात मुलींनी नेहमीप्रमाणे बाजी मारली आहे. यावर्षी जवळपास ९३.१५ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जवळपास ४ टक्क्यांनी अधिक आहे. मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८६.८० टक्के इतके आहे. केवळ बारावीतच नाही तर दहावीच्या परीक्षेतही मुलींनी बाजी मारली. दहावीच्या परीक्षेत ९४.९६ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या तर मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८९.५६ टक्के इतके आहे याचाच अर्थ बारावी प्रमाणे दहावीच्या परीक्षेतही मुलींनी बाजी मारली. अर्थात दहावी असो की बारावी निकालात कायम मुलीच बाजी मारत असतात हे आपण यावर्षीच नाही तर मागील अनेक वर्षापासून पाहत आहोत. निकालात मुलींनी बाजी मारणे ही नक्कीच अभिमानास्पद बाब आहे. परीक्षार्थी मुलींची संख्या कमी असूनही उत्तीर्ण होणाऱ्या मुलींचे प्रमाण जास्त असणे हे मोठ्या शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाचे लक्षण आहे. सावित्रीच्या लेकिंची ही गरुड भरारी पाहून संपूर्ण महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली आहे. एकेकाळी केवळ चूल आणि मूल इतकेच ज्यांचे जग होते त्या मुली आज गगनभरारी मारत आहेत. सावित्रीच्या लेकींचे हे यश निश्चितच प्रेरणादायी आहे. एकेकाळी ज्या मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते त्याच मुली आज शिक्षण व्यवस्थेचे सर्वात मोठे संचित बनू पाहत आहे. पुरोगामी महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. कठोर परिश्रमाने मुलींनी हे यश मिळवले आणि इतरांना प्रेरणा दिली. कठोर परिश्रमातून मुलींनी हे यश मिळवून समाजाला एक सकारात्मक संदेश दिला आहे. दहाही, बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन आणि सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस मनापासून शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे


# मराठी विषयात ९४ हजार विद्यार्थी नापास : चिंतनाचा विषय

**ज्योतिर्मय साहित्य**

दोन दिवसा पूर्वी महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने घेतलेल्या एसएससी परीक्षेचा निकाल लागला. मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना ७५ टक्यापेक्षा जास्त गुण मिळविल्याची दिसून आले. ही टक्केवारी म्हणजे प्राविण्य गुण म्हणायचे की गुणांची सूज म्हणावे ? पालकांच्या अपेक्षा मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. प्रत्येकाला वाटतं आपल्या पाल्याला ९५ टक्या पेक्षाही अधिक गुण मिळावे. पालक आपल्या अपेक्षांचं ओझं मुलाच्या डोक्यावर, मनावर टाकत आहेत. त्यातून गुण कमी मिळाले की पालकांची बोलणी विद्यार्थ्यांना खावी लागतात. आपल्या मुलांच्या बौद्धीक स्तरांची ज्यांना कल्पना आहे ते पालक समजून घेतात पण त्यांची संख्या तशी कमीच आहे.




आज इंग्रजी शाळा शहरापासून खेड्यातही निघाल्या आहेत. छोट्या गावातही मराठी, इंग्रजी माध्यमिक शाळा आहेत. विद्यार्थ्यांचा भावनिक मानसिक विकास व्हावा या उद्देशाने अभ्यासक्रमात भाषा विषय शिकवले जातात. प्रामुख्याने राज्यातील शाळेत इंग्रजी, मराठी, हिंदी, संस्कृत या भाषा इयत्ता १० ला घेतल्या जातात. बरेच विधार्थी विज्ञान, गणित या सारख्या विषयात चांगल्या गुणांनी पास होतात पण भाषा विषयात कमी गुण मिळवितात. काल परवा लागलेल्या १० वी च्या परीक्षेत राज्यात मराठी विषयात ९४ हजार विदयार्थी नापास झाले. महाराष्ट्रात एवढया मोठ्या प्रमाणात मराठी विषयात नापास होण्याचे हे प्रमाण शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांना चिंता व चिंतनाचा विषय आहे. विद्यार्थ्यांचे व शिक्षक पालकाचे या विषयाकडे विशेष लक्ष नसते. आपलीच मराठी भाषा आहे तिचा काय तेवढा अभ्यास करावयाचा ? तेवढ्या पुरते वाचले की पेपर सोडवता येतो. या नको त्या आत्माविश्वास त्यांना नडतो. कधी कधी तर बाकीच्या विषयात पास तर मराठी हिंदी भाषविषयात चक्क नापास. गेल्या अनेक वर्षापासून भाषा




विषयांना २० गुणांची तोंडी परीक्षा आहे. तरी सुद्धा मराठी विषयात विद्यार्थी नापास होतात. ही बाब मराठी माणसाला खटकणारी आहे. याला शिक्षक व पालक जबाबदार ठरतात. शिक्षकांनी विधार्थ्यांना भाषा विषयाची गोड़ी निर्माण करण्याची तयारी ठेवावी लागते. स्वतः अपडेट असावे लागते. भाषा हा विद्यार्थ्यांचा भावनिक विकास करीत असते त्यासोबत मानसिक, बौद्धीक विकास साधल्या जातो. हस्ताक्षर, शुद्ध लेखन, लिहण्याचा सराव, त्यांच्या कडून करून घ्यावा लागतो.

व्याकरणावर भर देणे महत्वाचे आहे. इंग्रजी शाळेतील मुलांना मराठीत सांगितलेले आकडे, संख्या कळत नाही. एकोनचाळीस, आठ्ठावन्न, अडूसष्ट ऐकविले की त्यांना समजतच नाहीत. ते आकडे, संख्या इंग्रजीत सांगा म्हणतात. अशा अवस्थेत मराठी विषयाला काय न्याय देणार ? मराठीभाषा विषयाच्या शिक्षकांनी सजगतेने या विषयाकडे पाहून आपल्या विद्यार्थ्यांना शिकविले पाहीजे. या विषया बाबतची अनास्था त्यांच्या मनातून काढून टाकणे गरजेचे आहे. संस्कृत, गुजराती उर्दू या भाषा विषयाचा निकाल खूप चांगला नव्हे, अधिक उत्तम लागतो. मग मराठीचा का नाही. असा प्रश्न महाराष्ट्रातील जबाबदार मराठी माणसाच्या मनात निर्माण होतो. या विषयावर शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांनी सुद्धा काहा उपाय सांगणे अगत्याचे आहे.




# आईवडीलच घडवू शकतात आपल्या मुलांचं भविष्य?

**ज्योतिर्मय साहित्य**

आईवडीलच घडवू शकतात आपल्या मुलांचं भविष्य. असं म्हटल्यास आतिशयोक्ती वाटणार नाही. कारण ते जसे वागतात. त्याचं अनुकरण त्यांची मुलं करीत असतात. जर ते दारु पित असतील तर मुलंही दारु पित असतात आणि ते जर व्याभिचार करीत असतील तर....... मुलंही व्याभिचारी निघतात. म्हणूनच खुद्द आईवडीलांनी चांगले वागण्याची गरज आहे. जेणेकरुन मुलांमध्येही चांगले संस्कार रुजतील व मुलांचं भविष्य उज्ज्वल बनेल.

झोपले का बाळांनो, उठा लवकर. आज शाळेत जायचंय. एका अशिक्षित आईचे उद्गार. ती अशिक्षित होती. परंतु तिला आपल्या बाळाची काळजी होती. तिला वाटत होतं की ते बाळ. ते आपलं आहे व शिकायला हवं. तो शिकून मोठा व्हायला हवा. त्याला आपल्यासारखं उन्हात राबावं लागू नये.

ती आई अशिक्षित असली तरी तिला शिक्षणाचं महत्व कळलं होतं. आज त्याच आईनं आपल्या बाळाच्या मागं लागून लागून त्यांना उच्च शिक्षण शिकवलं होतं. तिला नोकरी लागतांना वशिला हवा वा ओळखपारख हवी हेही माहीत नव्हतं. आज तिची मुलं उच्चशिक्षित झाली होती व चांगल्या हुद्यावर नोकरीलाही लागली होती.

आईवडील... सर्वांचेच आईवडील शिकवतात आपल्या बाळाला. आपल्या बाळाचं भविष्य घडविण्यासाठी प्रयत्न करतात. त्यांना उन्हातून सावलीत नेतात. त्यांच्या पुस्तकांची इच्छा पुरवतात. वाटतं की ते मुल उच्चशिक्षण शिकावं. परंतु सर्वच आईवडीलांची मुलं उच्चशिक्षित होतात का? याचं उत्तर नाही असंच येतं. काहींची मुलं उच्चशिक्षित होतात आणि काहींची. अजिबात शिकत नाहीत. त्याचं कारण काय?

मुलांचं उच्चशिक्षित होणं न होणं. यासाठी अनेक कारणं जबाबदार असतात. त्यातील मुख्य एक कारण असतात, त्या मुलांचेच आईवडील. मुलांच्या आईवडीलांच्या सवयी जर वाईट असतील, तर ती मुलं देखील वाईट मार्गाकडं नकळत जातच असतात. उदाहरण द्यायचं झाल्यास आजच्या काळातील मोबाईलचं देता येईल. आजचे आईवडील मुलांकडून अपेक्षा करतात की त्यांनी जास्त मोबाईल पाहू नये आणि स्वतःच मुलांसमक्ष मोबाईल पाहात बसतात. तेच पाहातं मुल व तेही मोबाईल पाहायला बसतं आणि मोबाईल हिसकल्यास जोरजोरानं रडतं. मग ते मुल रडू नये म्हणून खुद्द आईवडील त्याला मोबाईल देतात व ते चूप बसतं.

मोबाईल पाहण्याची ही आईवडीलांची सवय. तीच सवय बाळांना लागते. आज अगदी लहान बाळ, मग ते एक वर्षाचं का असेना, ते आपल्याला त्रास देतं म्हणून वा त्यानं आपल्याला त्रास देवू नये म्हणून खौद्द आईवडीलच त्याच्या हातात मोबाईल देतात. तो चूप, मग आपलंही काम सुकर. अशी अपेक्षा. परंतु त्यातून आपलं मूल बिघडतं. याचा विचार कोणीच करीत नाही. ही झाली मोबाईलपुराणाची गोष्ट. दुसरी महत्वपुर्ण गोष्ट आहे, आईवडीलांच्या सवयी. त्या सवयीही वाईटच असतात आणि त्याच सवयी बाळांना अगदी ते एकदोन वर्षाचे असतात. तेव्हापासूनच लागत असतात.

मुख्यतः श्रीमंत असो की गरीब असो. आईवडीलांना खर्रा खाण्याची सवय असते. अशावेळेस ते आईवडील स्वतः दुकानात न जाता आपल्या मुलांना पाठवतात. ज्यातून खर्रा खाण्याची सवय मुलांमध्ये लागू शकते. काही घरी वडील हे आपल्याच मुलांसमोर दारु पितात. अशावेळेस मुलांना दारुची सवय लागू शकते. काही स्रिया आपली मुलं लहान असतांनाच आपल्या पतीला कामावर जावू देतात व परपुरुषांसोबत व्याभिचार करतात. अशावेळेस मुलांमध्ये व्याभिचाराची सवय लागू शकते. अशी मुलं लहानपणापासूनच त्यांचे आईवडील करीत असलेल्या काही वेगवेगळ्या अनैतिक गोष्टी पाहात असतात. ज्यातून वाईट सवयीचं बीजारोपण होतं. मग मुलं वाईट मार्गावर लागली आणि त्यांनी वाईट कृत्य केलं तर आपल्याला त्याचा पश्चाताप होतो. ही सत्य बाब आहे. परंतु पश्चाताप होण्यापुर्वी जर मुलांची घडणी चांगल्या स्वरुपाची व्हावी असं जर वाटत असेल पालकांना तर त्यांनी त्यांना आपल्या कोणत्याही वाईट सवयी न दाखवता जर चांगल्या गोष्टी सांगीतल्या तर मुलांमध्ये चांगल्या गोष्टी टाकता येतील. चांगल्या मुल्य वा संस्कारांचे त्यांच्यात बीजारोपण करता तरी येवू शकेल. यात आणखी एक उदाहरण. एक व्यक्ती दारु प्राशन करायचा. त्याला रोज सायंकाळी दारु प्यायल्याशिवाय झोपच येत नव्हती. परंतु एक दिवस त्यानं आपल्या तरुण व नुकत्याच वयात आलेल्या मुलाला पाहिलं. त्याला कळलं की दारु वाईट. आपण जशी पितो. तसा मुलगाही प्यायला लागला. ज्यातून मुलाचं भविष्य खराब होणारच. त्यानंतर त्यांना परमात्मा एक. ज्यात दारु अजिबात चालत नाही. हा धर्म घेतला. ज्यातून स्वतः दारु सोडली. ते पाहून मुलालाही नाईलाजास्तव दारु सोडावी लागली. कारण धर्माचं वलय देवून व त्याला संकटाची जोड देवून दारु पिवून घरी आल्यास संकट उद्भवतं. अशी आख्यायिका त्या धर्मात असल्यानं दारुला अजिबात तो मुलगा स्पर्श करीत नव्हता. अशानं त्या मुलात संस्कार वाढीस लागले. दुसरं उदाहरण बाबासाहेबांचं. त्यांचे वडील रामजी सपकाळ कसेही असोत. त्यांनी आपल्या मुलाला घडवीत असतांना चांगली वागणूक ठेवली. ज्यातून डॉ. बाबासाहेब घडले.

**अंकुश शिंगाडे**
नागपूर
९३७३३५९४५०

महत्वाचं सांगायचं झाल्यास आईवडील हेच आपल्या बाळांमध्ये जास्त प्रमाणात संस्कार रुजवू शकतात. जर त्यांनी चांगलं वर्तन घरी ठेवलं तर... कारण आपल्याच वागण्यातून मुलं घडत असतात. आपण कसे वागतो? काय खातो? खाय पितो? हे पाहात असतात मुलं. ते पाहून एखाद्या दिवशी त्याचप्रमाणे करौ पाहतात. ज्यातून संस्कार बिघडतोच. याचाच अर्थ असा की आईवडीलांच्याच विकृत वागण्यातून मुलं बिघडतात. ते जर सुसंस्कारी असतील तर मुलंही सुसंस्कारी निघतात. त्यासाठी आईवडीलांनी खुद्द स्वतःला चांगल्या सवयी लावाव्यात. जेणेकरुन त्यांचंच अनूकरण करौन मुलंही चांगली संस्कारी निघतील. जे संस्कार त्यांच्या पश्चात मुलांच्याच कामात येतील. जसे थॉमस अल्वा एडीसन. त्यांच्या आईनं त्याला शास्रज्ञ बनवून दाखवलं. ज्याचं इवलसंही कसब थॉमसच्या आईमध्ये नव्हतं. दुसरं उदाहरण शिवाजी महाराजांचं देता येईल की ज्यांच्या आईनं बाल शिवबाला शिकवलं. ज्यातून स्वराज्याची नीव बांधली गेली. अशी बरीच उदाहरणं आहेत की ज्यांच्या आईवडिलांनी त्यांच्या मुलांना घडवलं आहे.

मुखत्वे सांगायचं म्हणजे संस्कार हे मुल्य काही बाजारात मिळत नाहीत. ते घरातच मिळतात, आपल्या आईवडीलांच्या वागण्यातून. आईवडील हेच आपल्या बाळात संस्कार टाकू शकतात. परंतु ते टाकण्यासाठी खुद्द आईवडीलांना आपल्या वाईट सवयीवर बंधन घालावं लागतं. अशी बंधनं जे आईवडील घालू शकतात. त्यांचीच मुलं चांगली सुसंस्कारी बनू शकतात. इतरांची नाही. म्हणूनच खुद्द आईवडीलांनीच संस्कारी राहावे. दारुची सवय असेल तर दारु सोडून द्यावी किंवा मुलांसमोर पिवू नये. व्याभिचाराचक सवय असेल तर तिही गोष्ट सोडून द्यावी. कारण तशा वाईट सवयी या आनुवांशिकतेच्या तत्त्वानुसार गुणसुत्राच्या रुपाने तरी आपल्या येणाऱ्या पिढीत उतरत असतात. म्हणूनच आईवडीलांनी सावधानता बाळगावी. निदान संस्कारासाठी. जर आपली येणारी पिढी चांगली निपजावी, असं वाटत असेल तर......विशेष म्हणजे आईवडीलच घडवू शकतात आपल्या मुलांचं भविष्य. असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. कारण ते जसे वागतात. त्याचं अनुकरण त्यांची मुलं करीत असतात. जर ते दारु पित असतील तर मुलंही दारु पित असतात आणि ते व्याभिचार करीत असतील तर... मुलंही व्याभिचारी निघतात. म्हणूनच खुद्द आईवडीलांनी चांगले वागण्याची गरज आहे. जेणेकरुन मुलांमध्येही चांगले संस्कार रुजतील व मुलांचं भविष्य उज्ज्वल बनेल. हे तेवढंच खरं.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559